# NASA निविदापूर्व सभा दि.३०/०४/२०२६ रोजीचे इतिवृत्त

**शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद रत्नागिरी या कार्यालयामार्फत रत्नागिरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील इयत्ता ७ वी मधील निवडक विदयार्थ्यांची NASA या अंतराळ संशोधन संस्थेस भेट घडवून आणणे करीता मक्तेदाराची निवड करणे या कामाची निविदा प्रसिध्द करण्यात आलेली असून त्याची निविदापूर्व सभा दि.३०/०४/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.सदर सभेला खालीलप्रमाणे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीम.वैदेही रानडे भा.प्र.से. | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद रत्नागिरी |
| २ | श्री.परिक्षित यादव | अति.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद रत्नागिरी |
| ३ | श्री. सुरेखा जाधव | उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद रत्नागिरी |
| ४. | श्रीम.निलिमा नाईक | शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद रत्नागिरी |
| ५ | श्री.चंद्रकांत सुर्यवंशी | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद रत्नागिरी |

सदर सभेला खालीप्रमाणे मक्तेदार उपस्थित होते.

| अ.क्र. | मक्तेदाराचे नाव | कंपनीचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री.अभिनव गुप्ता | IRCTC |
| २ | श्री.अजिम पठाण | Evergreen Global holidays |
| ३ | श्री.ऋषी गौतम | Self |

सभेच्या सुरुवातीला शिक्षणाधिकारी (प्राथमिक) , जि.प. रत्नागिरी यांनी सर्वांचे स्वागत केले. शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद रत्नागिरी या कार्यालयामार्फत रत्नागिरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील इयत्ता ७ वी मधील निवडक विदयार्थ्यांची NASA या अंतराळ संशोधन संस्थेस भेट घडवून आणणे या कामाकरीता निविदा मागविण्यात आलेली आहे त्या अनुषंगाने आज निविदापूर्वक बैठक आयोजित केली असल्याचे सांगितले.

सदर निविदापूर्व बैठकीस दोन मक्तेदार व्यक्तीश हजर होते तर एक मक्तेदार ऑनलाईन उपस्थित होता. सर्वप्रथम मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री.अभिनव गुप्ता IRCTC यांना त्यांचे मुददे मांडणेस सांगितले. श्री.अभिनव गुप्ता IRCTC यांनी सर्वप्रथम निविदेमध्ये दौ-याच्या तारखा नमूद नसलेबाबत सांगितले यावर मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदयार्थ्यांची निवड झाली असून दौरा हा साधरण ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्याच्या आसपास आयोजित केला जाऊ शकतो असे सांगितले.त्याचबरोबर दौरा हा NASA ची परवानगी आणि VISA मिळाल्यानंतरच आयोजित केला जाईल् असे सांगितले. तसेच निविदा रकमेमध्येच सर्व सोई सुविधा पुरवणे अंतर्भुत असून त्याकरीता जिल्हा परिषदेमार्फत कोणताही अतिरिक्त निधी मक्तेदाराला दिला जाणार नसल्याचे सांगण्यात आले.

Scanned with OKEN Scanner

ऋषी गौतम मक्तेदार यांनी निविदेमध्ये Turnover Certificate आवश्य असल्याचे सांगितले तथापि वार्षिक Turnover किती असणे आवश्यक आहे याबाबत माहिती नसल्याचे सांगितले यावर मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कामाच्या १ पट Turnover असणे आवश्यक असल्याचे सांगितले .त्यानंतर श्री.ऋषी गौतम मक्तेदार यांनी EMD सूट करीता महाराष्ट्राबाहेरील MSME कंपनीचे रजिस्ट्रेशन असल्यास सूट आहे का अशी विचारणा केली यावर मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी EMD सूट करीता MSME कंपनीचे रजिस्ट्रेशन केवळ महाराष्ट्राचे असणे बंधनकारक असल्याचे सांगितले.

श्री.अजिम पठाण मक्तेदार यांनी निविदा अटी व शर्तीमध्ये अनुभवाकरीता केवळ जिल्हा परिषद शाळांचा NASA दौरा पूर्ण केलेल्याचा अनुभवाची अट अंतर्भूत करावी अशी मागणी केली यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जास्तीत जास्त स्पर्धा होणाच्या दृष्टीने विदेशी अभ्यास दौरा पूर्ण केल्याची अट टाकण्यात आली असल्याचे सांगितले त्यामुळे मूळ निविदा अटी व शर्तीमध्ये बदल केला जाणार नाही असे सांगितले.

सभेच्या शेवटी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) , जि.प. रत्नागिरी यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

(निलिमा नाईक)
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद रत्नागिरी

(वैदेही रानडे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

Signature Not Verified
Digitally signed by Chandrakant Devidas Suryawanshi
Date: 2026.05.04 11:10:34 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner